# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २९/०६/२०२१ (मंगळवार )

## चंद्रपुर जिल्हयात जाणारी विदेशी दारु जप्त

दिनांक २८/०६/२०२१ रोजी पोलीस स्टेशन बोरी चे पथकास गुप्त बातमीदार कडून माहिती मिळाली की, टाटा झेस्ट कार क्र एम एच ३४ बी एफ २४५२ द्वारे चंद्रपूर जिल्हयात मोठया प्रमाणात अवैध रित्या दारुची वाहतुक होणार आहे. नमुद माहिती वरुन नाकाबदी करुन वाहन क्र एम एच ३४ बी एफ २४५२ चेक केले असता असता सदर वाहनामध्ये वाहन चालक राजेश राधेश्याम सोनी वय ५० वर्ष रा पठाणपुरा रोड पाटील भटटीचे पाठीमागे जि चंद्रपुर हा अवैधरित्या विनापरवाना १.रॉयल स्टॅग कंपनिच्या ९६ निपा प्रत्येकी १८० एमएल किंमती १८०रू प्रमाणे एकुण १७२८० रूप्ये २.मॅकडोनाल्ड नं १ च्या ९६ निपा प्रत्येकी १८० एम एल च्या १६०/—रू प्रमाणे एकुण १५३६०/—रू ३.मॅकडोनाल्ड नं १ च्या २४ पाईन्ट प्रत्येकी ३७५ एम एल किमंती ३२० प्रमाणे एकुण ७६८०/—रू ४.हायवर्ड बियर १२० नग प्रत्येकी ५०० एम एल किमंती १८,०००/—रू असा एकुण ५८३२० चा माल व टाटा झेस्ट कार क्र एम एच ३४ बी एफ २४५२ किमती ५०००००/—रू असा एकुण ५५८३२०/—रू चा माल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी पोशि पोहवा असलम ब.न. १७१ पो.स्टे. बोरी चे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी वाहन चालक राजेश राधेश्याम सोनी वय ५० वर्ष रा पठाणपुरा रोड पाटील भटटीचे पाठीमागे जि चंद्रपुर चे विरुध्द पोलीस स्टेशन बोरी येथे अप क्र. २८४/२०२१ कलम ६५अ, ६५ई मदाका सहकलम १०९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सपोनी साखरकर सा.७३५०९०२१०० हे करीत आहे.

## —: चोरी (ट्रक्टर व ट्राली) :—

पो.स्टे.खापा :— अंतर्गत १ किमी अंतरावरील मौजा खापा येथील दंदे देशी भट्टीचे बाजुला प्रफुल सुधाकर मोहटे रा खापा यांची शेती आहे. यांचे मालकीचे ट्रॅक्टर मुंडा क्र. एम.एच.४०बी.जे.९ २४५ कि. ५,९०,०००/रू व विना नंबरची ट्रॉली कि. १,५०,०००/रू असा एकुन ७,४०,०००/रू चा माल कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी प्रफुल सुधाकर मोहटे वय ३८ वर्ष रा खापा चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन खापा येथे कलम ३७९ भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंद केला असून आरोपीचा शोध घेणे सूरु आहे. पुढील तपास नापोशि विजय बारई पो. स्टे. खापा मो.नं. ९८२२२८९५७२ हे करीत आहे.

## —: अकस्मात मृत्यु :—

पो.स्टे.नरखेड :— नरखेड शहर अंतर्गत वार्ड १४ इंदिरानगर येथील रहवासी गं.भा. कमला रमेश काडलकर वय ६८ वर्षे रा. नरखेड वार्ड क्र. १४ इंदिरा नगर नरखेड यांनी दिनांक २८/०६/२१ रोजी आपली तोंडी रिपोर्ट नोंदविली की, दिनांक २७/०६/२१ चे ०४.०० ते २८/०६/२१ चे १९.०० वा दरम्यान तिचा मुलगा नामे सुरेश रमेश काडलकर याने अज्ञात काराणावरून विहीरीच्या पाण्यात उडी घेवुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी गं.भा. कमला रमेश काडलकर वय ६८ वर्षे रा. नरखेड वार्ड क्र १४ इंदिरा नगर नरखेड चे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन नरखेड येथे अकस्मात मृत्यु क्रमांक २५/२१ कलम १७४ जाफौ नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ राजु गजभिये हे करित आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**